


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १२८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२१ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# बुटीबोरी एमआयडीसीत भीषण दुर्घटना ६ मजुरांचा मृत्यू, ९ जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात शुक्रवारी सकाळी एक भीषण औद्योगिक दुर्घटना घडली. येथील अवाडा कंपनीच्या प्रकल्पस्थळी उभारण्यात येत असलेला उंच टँक टॉवर अचानक कोसळल्याने सहा मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर नऊ कामगार जखमी झाले आहेत. यापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण औद्योगिक परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

शुक्रवारी सकाळी सुमारे ११.१५ ते ११.३० दरम्यान बुटीबोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नवीन एमआयडीसी परिसरात घडली. अवाडा कंपनीमध्ये उभारण्यात येत असलेल्या पाण्याच्या टाकीच्या टँक टॉवरचा अचानक स्फोट होऊन संपूर्ण संरचना कोसळली. मोठ्या आवाजासह टॉवर जमीनदोस्त झाल्याने परिसरात धूळ आणि मलब्याचे ढग पसरले आणि कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.



या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या मजुरांमध्ये अरविंद कुमार ठाकुर (२८), अशोक कंचन पटेल (४२), अजय राजेश्वर पासवान (२६), सुधांशु कुमार नागेश्वर साहणी (३६), बुलेट कुमार इंद्रजित षहा (३०) आणि शमिम अन्सारी (४२) यांचा समावेश आहे. सर्व मृत मजूर हे बिहार राज्यातील विविध जिल्ह्यांतील रहिवासी होते. घटनेनंतर त्यांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्यांमध्ये प्रकाश बुल्ला साहनी, अन्वर अन्सारी आणि मुफ्तार अन्सारी यांचा समावेश आहे. तसेच बाबुचंद प्रसाद, जाकीर शहनवाज हुसेन, इब्रहिम नयीम अन्सारी, मयुरी रविंद्र तुरक, विकास कुमार पप्पु सहानी आणि संतोष दुधनाथ गौतम हे कामगार जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तातडीने बुटीबोरी येथील माया हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. जड यंत्रसामग्रीच्या साहाय्याने मलबा हटवण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण परिसर सील करण्यात आले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, अवाडा कंपनीत सौर पॅनल निर्मिती आणि त्यासंबंधित पायाभूत सुविधांचे काम सुरू होते. टँक टॉवरचे बांधकाम अंतिम टप्प्यात असताना त्याचा समतोल बिघडल्याने ही दुर्घटना घडल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. बांधकामातील निष्काळजीपणा, तांत्रिक त्रुटी किंवा सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले का? याचा सखोल तपास करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. या दुर्घटनेमुळे औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## घरफोडी करणाऱ्या परराज्यातील चोरास अटक
## सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह १९.८४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.२०, चंद्रपूर :** शहरातील बंद घरे हेरुन घरफोडी करणाऱ्या परराज्यातील एका सराईत चोरास रामनगर पोलिसांनी अटक केली. आरोपींकडून सोन्या, चांदीच्या दागिन्यांसह १९ लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मुस्तकीन मो. शौकीन चौधरी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार रामवगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक आसिफराजा शेख यांनी गुन्हे शोध पथकास घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांचा सखोल तपास करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन घरफोडीचे गुन्हे एकाच पध्दतीने व एकाच वेळी झाल्याचे निदर्शनास आले. तांत्रिक तपास व गोपनीय यंत्रणा सक्रीय केल्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार, उत्तरप्रदेश येथील रहिवासी मुस्तकीन मो. शौकीन चौधरी घराची दारे, खिडक्या बसविण्याचे व दुरुस्तीचे काम करण्याच्या बहाण्याने शहरात फिरुन बंद घरे हेरत होता. त्यानंतर तो चारचाकी वाहनातून येऊन घरफोडीचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या आरोपीवर पाळत ठेवून मुद्देमास विक्रीसाठी घेऊन जात असताना त्यास ताब्यात घेतले. तपासात आरोरीकडून सोन्या-चांदीचे दागिने व गुन्ह्यात लापरलेली चारचाकी असा एकूण १९ लाख ८४ हजार रिपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास रामनगर पोलिस करीत आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

## 'तो' सिरिअल किलर अखेर पुण्यात सापडला

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२०, पुणे :** किरकोळ वाद आणि एकतर्फी प्रेमातून घडलेल्या दोन वेगवेगळ्या खुनांच्या घटनांचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले असून, या प्रकरणांत चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. अटक केलेल्या आरोपींपैकी एकाने अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड येथेही किरकोळ कारणावरून एकाचा खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा आरोपी सीरियल किलर वृत्तीचा असल्याची शंका पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी व्यक्त केली.

सासवड आणि जेजुरी येथे या खुनाच्या घटना घडल्या होत्या. सासवड शहरात किरकोळ वादातून नऊ डिसेंबरला राजू दत्तात्रेय बोराडे (वय ३८, रा. म्हाडा कॉलनी, सासवड) यांचा खून करण्यात आला. एका बांधकाम साइटवर त्यांचा मृतदेह आढळून आला होता. त्यांच्या गळ्यावर धारदार हत्याराने वार करून त्यांचा खून केल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी सासवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखा व सासवड पोलिस ठाण्याच्या पथकांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे बांधकाम मजूर असणारे सूरजप्रकाश बलराम निषाद (वय ३४, मूळ छत्तीसगड) आणि नीरज ओमप्रकाश गोस्वामी (वय २५, मूळ मध्य प्रदेश) यांना अटक केली. दारू पित असताना किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून बोराडेचा धारदार हत्याराने खून केल्याची कबुली आरोपींनी दिली. आरोपींकडे सखोल चौकशी केली असता, नीरज गोस्वामी याच्याविरुद्ध यापूर्वी जामखेड (जि. अहिल्यानगर) येथेही खुनाचा गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली. दोन्ही आरोपींना १९ डिसेंबर २०२५पर्यंत पोलिस कोठडी मंजूर करण्यात आली आहे.

## मतमोजणीदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे निर्बंधात्मक आदेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, राजुरा, गडचांदूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, ब्रम्हपुरी, नागभीड, मूल, घुग्घुस या नगरपालिकांसह भिसी नगरपंचायतीसाठी दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळीन १० वाजतापासून मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्बंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजेपासून मतमोजणीची संपूर्ण प्रक्रीया संपेपर्यंत लागू राहतील. आदेशानुसार, मतमोजणी केंद्राच्या बाहेरील १०० मीटर परिसरात सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रतिबंध राहील. तसेच दुकाने, आस्थापना व व्यवसाय केंद्र बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी, पोलील, विद्युत अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थेतील वाहनांचाच केंद्र परिसरात प्रवेश देण्यात येणार असून, इतर सर्व वाहनांवर बंदी राहील. राज्य निवडणूक आयोगाने वितरीत केलेल्या अधिकृत ओळखपत्रांशिवाय कोणालाही मतमोजणी परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. तसेच मतमोजणीच्या दिवशी केंद्राच्या बाहेरील १०० मीटर



परिसरात दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. उमेदवार व पत्रकारांना ठरवून दिलेल्या बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार मोबाईल फोन वापरण्याची मुभा देण्यात आली असली तरी प्रत्यक्ष मतमोजणी कक्षात मोबाईल फोन किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण नेण्यास व वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

याशिवाय, मतमोजणी केंद्राच्या सभोवताल १ किलोमीटर परिसरात दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणी प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत ड्रोन किंवा ड्रोनसदृश उडणाऱ्या वस्तू उडविण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अतिवृष्टीमुळे द्राक्ष निर्यात घटली; निर्यातदार शेतकऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या घटली

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्याचा थेट परिणाम द्राक्ष निर्यातीवर होताना दिसत आहे. द्राक्ष बागायतदार संघाच्या प्राथमिक अंदाजानुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या घटण्याची शक्यता आहे. आज अखेर राज्यभरातून केवळ ९,४३५ शेतकऱ्यांनी द्राक्ष निर्यातीसाठी नोंदणी केली असून, गेल्या वर्षी ही संख्या सुमारे ४२ हजारांवर होती.

गेल्या हंगामात राज्यातून १ लाख ९३ हजार ६९९ टन द्राक्षांची निर्यात झाली होती. मात्र, यावर्षी हवामानातील अनिश्चितता, सततची अतिवृष्टी, तसेच बागांमध्ये बुरशीजन्य रोगांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी द्राक्षांच्या घडांची गुणवत्ता खालावली असून, निर्यात दर्जाची द्राक्षे कमी प्रमाणात उपलब्ध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. द्राक्ष निर्यात प्रामुख्याने जानेवारीच्या मध्यापासून सुरू होणार असून, फेब्रुवारीच्या मध्यावर निर्यातीला खरा वेग येतो. मात्र सध्या वाढत असलेली थंडी, ढगाळ हवामान आणि तापमानातील चढ-



उतार यामुळे उत्पादनात आणखी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याचा थेट फटका निर्यातक्षम द्राक्षांच्या उपलब्धतेवर बसणार आहे.


युरोपियन देशांसह आखाती राष्ट्रांमध्ये भारतीय द्राक्षांना मोठी मागणी असते. दर्जेदार, गोड आणि टिकाऊ द्राक्षांसाठी परदेशी बाजारपेठेत भारताची वेगळी ओळख आहे. तथापि, निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा ही मागणी पूर्ण करणे अवघड ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे निर्यातीचे ठरवलेले उद्दिष्ट गाठणे यावर्षी आव्हानात्मक ठरणार असल्याचे द्राक्ष बागायतदार आणि निर्यातदारांकडून सांगण्यात येत आहे. एकूणच, अतिवृष्टी आणि हवामान बदलांचा फटका द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना सहन करावा लागत असून, याचा आर्थिक परिणाम मोठ्या प्रमाणात जाणवणार आहे. शासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मतमोजणीपूर्वी अघोरी प्रयोग? राजकीय चर्चांना उधाण!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नंदुरबार :** मार्गशीर्ष अमावस्येच्या मुहूर्तावर शुक्रवारी रात्री तळोदा तालुक्यातील अंकलेश्वर-बऱ्हाणपूर राज्य मार्गावरील चिनोदा चौफुलीवर अघोरी जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शनिवारी सकाळी नागरिकांच्या निदर्शनास हा प्रकार येताच परिसरात एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे मतमोजणीच्या अगदी आदल्या दिवशी ही घटना घडल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

२१व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मोठी झेप घेतली असतानाही समाजात अंधश्रद्धेचे प्रकार अजूनही सुरू असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. मार्गशीर्ष अमावस्येला 'दर्श अमावस्या'




असेही संबोधले जाते. पंचांगानुसार ही अमावस्या शेती, पितरपूजन, स्नान, दान आणि दीपपूजेसाठी महत्त्वाची मानली जाते. चंद्रदर्शन होत नसल्याने तिला 'दर्श' असे नाव देण्यात आले आहे. अनेक कुटुंबांमध्ये या दिवशी घराची स्वच्छता करून लक्ष्मीपूजन केले जाते. मात्र याच अमावस्येचा मुहूर्त साधून अज्ञात व्यक्तींनी चौफुलीवर अघोरी जादूटोण्याचा प्रकार केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. चौफुलीच्या मध्यभागी खडूने मोठे वर्तुळ आखण्यात आले होते. या वर्तुळाच्या आत फाटकी काळ्या रंगाची पॅन्ट, शाळकरी मुलाची बॅग, शाळेचे बूट, शर्ट, रुमाल अशी विविध वस्त्रे ठेवण्यात आली होती. तसेच नवीन ताट, दोन वाट्या, ग्लास, लिंबू, कुंकू आणि इतर पूजेचे साहित्यही त्या ठिकाणी आढळून आले. संपूर्ण दृश्य पाहता हा प्रकार साधा नसून अघोरी जादूटोण्याचाच असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

रस्त्याच्या अगदी मधोमध हा प्रकार केल्यामुळे सकाळच्या वेळी मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अनेक वाहनधारकांनी धडकी भरल्याने त्या वर्तुळाला चुकवून सावकाश किंवा पर्यायी मार्गाने प्रवास केला. काही नागरिकांनी थांबून हा प्रकार पाहिल्यानंतर तीव्र संताप व्यक्त करत अंधश्रद्धेवर नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, तळोदा नगरपालिकेची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार असून, त्याच्या एक दिवस आधी हा प्रकार घडल्याने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

अशा अंधश्रद्धेच्या प्रकारांवर प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, संबंधितांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. विज्ञानवादी विचारसरणी रुजवण्यासाठी जनजागृतीची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समाजाने सजग राहावे, असे आवाहन जाणकारांकडून करण्यात येत आहे.

# संपादकीय



## महाराष्ट्राची खाद्यजत्रा...

दिल्लीतल्या प्रसिद्ध थंडीचा मोसम सुरू झालाय. संसदेत चर्चेसाठीही पात्र नसल्याची राजकारण्यांना वाटावीत अशी विषारी वायू प्रदूषणासारखी संकटं असली तरी दिल्लीतली थंडी खरोखरच 'अंगांगानं उपभोगावी' अशी असते! साहित्य-कला-संस्कृतीला याच काळात खरा बहर येतो. अशा वातावरणात यंदा भर पडली ती एका वेगळ्या म्हणजे मराठी खाद्यमहोत्सवाची

नवीन महाराष्ट्र सदनाचा परिसर मागच्या शुक्रवारपासूनचे तीन दिवस फुलून गेला होता. मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरताच अस्सल मराठी खाद्यपदार्थांचा दरवळणारा खमंग सुगंध तुमचं स्वागत करे. राज्याच्या अनेक भागांची खासियत असलेल्या पदार्थांचे स्टॉल तेथे स्वागतास सज्ज होते. याचं निमित्त ठरलं महाराष्ट्र खाद्यमहोत्सव. अनेक त्रुटी असल्या तरी नवीन सदनात पहिल्यांदाच झालेल्या या खाद्यमहोत्सवाला दिल्लीतल्या भर थंडीतही खवय्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. महाराष्ट्राच्या मातीतील वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी तीन दिवसांत पंधरा ते वीस हजार खाद्यप्रेमींची गर्दी होणं लक्षणीय होतं. राज्य सरकारच्या 'उमेद' योजनेंतर्गत आठ जिल्ह्यांतील महिला स्वयंसहाय्यता गटांचा सहभाग हे याचं वैशिष्ट्य ठरलं. महोत्सवात एकूण २५ स्टॉल्स होते. उकडीच्या मोदकांपासून खापरावरची पुरणपोळी, खास मराठी चवीचा गाजराचा हलवा, झुणका-भाकर, मिसळपाव, वडापाव, साबुदाणा खिचडी, थालीपीठ, कोथिंबीरवडी, कच्च्या वांग्याचं भरीत, गोळा भात, सोलकढी, सांबार वडीपासून कोल्हापुरी तांबडा-पांढरा रस्सा, मालवणी रस्सा, सुके बोंबील, झणझणीत सावजी मटण रस्सा नावं वाचूनच तोंडाला पाणी सुटावं असं खाद्यब्रह्म इथं साक्षात अवतरलं होतं. फिरता फिरता मध्येच ताज्या मासळीचा वास हवेत दरवळे तेव्हा 'मासळीचा सेवित स्वाद दुणा, इतुक्या लवकर येई न मरणा' या बाकीबाब बोरकरांच्या ओळी सहजच मनाच्या दर्यात लवलवू लागत! राजधानीतला हा मराठी खाद्यमहोत्सव केवळ पोटपूजेचा नव्हे, तर आठवणींचा आणि आपुलकीचा उत्सव ठरला.

पोटासाठी भटकत आपल्या मातीपासून कितीही दूर आला तरी मराठी माणसाची चव मात्र कधीच बदलत नाही. वरचे सारे पदार्थ एरव्ही दिल्लीत मिळत नाहीत असं नाही; पण या महोत्सवात ते पदार्थ करण्यात चोवीस तास गढलेल्या मायमावश्यांच्या हातचा गोडवा जणू त्या पदार्थांत मिसळून त्यांची लज्जत चवीचवीनं आणखी वाढली होती. प्रत्येक स्टॉल त्या त्या भागातली एखादी खाद्यकथा सांगत होता. ऑर्डर दिल्यावर तो पदार्थ ताटात वाढून येईपर्यंत शेजारी तशाच प्रतीक्षेत असलेले चेहरे अनोळखी असले तरी 'तुम्ही कुठले?' या प्रश्नानंतर सुरू होणारा संवादसेतू, त्यातून उलगडत जाणाऱ्या गावाच्या, शाळेच्या, सणांच्या आठवणी हा माहौलच विलक्षण सुखावणारा होता. राजकारणाच्या पलीकडची मराठी अस्मिता इथं अगदी सहजपणे झुळझुळत होती. अखेर हे एक सरकारी आयोजन होतं. त्यामुळे त्यात त्रुटी नव्हत्याच, असं म्हणणं धाडसाचं ठरेल. एक तर महाराष्ट्रातून आलेल्या भगिनींकडं मनुष्यबळाची मोठी कमतरता असल्यानं आणि इतका प्रतिसाद मिळेल याची कदाचित कल्पना नसल्यानं सांगितलेला पदार्थ तयार होऊन मिळेपर्यंत थंडीत दीर्घ प्रतीक्षा करावी लागणं आणि पदार्थांचे अतिशय चढे दर याही गोष्टी लक्षात आल्या. पर्यटन वृद्धीसाठी आपल्याकडच्या वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृतीची जाहिरात करण्याच्या मार्गाने जाणं अनेक राज्य सरकारांनीही आजकाल पसंत केल्याचं दिसत आहेच. या पार्श्वभूमीवर, खुद्द निवासी आयुक्त आर. विमला आणि उत्तम शेफ असणारे सहायक आयुक्त नितीन शेंडे यांनी पुढाकार घेतलेल्या या मराठमोळ्या खाद्यमहोत्सवाची दिल्लीतही आणखी जाहिरात करता आली असती, असं जाणवतं राहिलं.


महोत्सवाचं उद्घाटन करणारे शेफ विष्णू मनोहर यांच्याशी बोलताना, आंतरराष्ट्रीय ख्यातीची क्षमता असूनही मराठी पदार्थ ब्रँडिंग करण्यात मागं का पडतात असा विषय निघाला. मराठी मानसिकताच काहीशी मागं मागं राहण्याची आहे. अपवाद वगळता मराठी खासदारांपासून अधिकाऱ्यांपर्यंत ठायी ठायी याची प्रचिती येते. 'आपणच आपली टिमकी कशाला वाजवायची,' अशा पूर्वापार समजुतीमुळं मराठी माणूस पुढे पुढे करण्याचं टाळतो आणि दिल्लीसारख्या महासागरात एकाकीपणा अनुभवतो. म्हणजे बघा, अख्ख्या संसदेत आपल्याबरोबर आई-वडिलांच्या नावाची, मुरलीधर रुक्मिणी किसनराव मोहोळ, अशी पाटी संविधान सदनातल्या आपल्या दालनावर लावणारे एकमेव मंत्री खणखणीत मराठी आहेत हे वास्तव. इतर प्रातांचे असे कोणी असते तर त्यांनी याची दणकून जाहिरात केली असती यानंतरही करतील. पण इथं, आपणच आपलं काय सांगायचं, अशी भावनाच जास्त, असो. काहीही असलं तरी महाराष्ट्र सदनानं प्रथमच भरवलेला हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांचा उत्सव नव्हता, तर महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आणि ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण यांचा संगम ठरला. दिल्लीकरांनी याला दिलेला उत्साहपूर्ण प्रतिसाद पाहता, ही परंपरा चालू राहिली तर आनंद वाटेल, ही आर. विमला यांची अपेक्षा पुढच्या काळात पूर्ण होते का ते बघायचं.

# जागतिक ध्यान दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व

२१ डिसेंबर हा दिवस जगभर जागतिक ध्यान दिन (World Meditation Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ योग, ध्यान, विपश्यना किंवा अध्यात्माशी निगडित व्यक्तींसाठी मर्यादित नसून, आजच्या तणावपूर्ण, धावपळीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात प्रत्येक व्यक्तीसाठी आत्मपरीक्षण, मानसिक शांतता आणि जीवनातील समतोल साधण्याचा संदेश देणारा आहे. आधुनिक मानवाने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, माहिती आणि दळणवळणाच्या साधनांमध्ये अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु याच वेळी मानसिक तणाव, अस्वस्थता, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि असमाधान हे जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहेत. बाह्य प्रगतीच्या वेगात अंतर्मनाची गरज दुर्लक्षित होत चालली आहे. अशा पार्श्वभूमीवर ध्यान ही केवळ आध्यात्मिक साधना न राहता, मानसिक आरोग्य, सामाजिक सलोखा आणि मानवता जपण्यासाठी अत्यावश्यक साधन ठरत आहे. जागतिक ध्यान दिन हे या व्यापक समाजशास्त्रीय संदर्भाचे प्रतीक आहे आणि प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद साधण्याची संधी देते.

मानव जीवनातील मानसिक अस्वस्थतेचे थेट प्रतिबिंब समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता अत्यंत गंभीर आहे. आजच्या समाजात सततची स्पर्धा, अपयशाची भीती, आर्थिक अस्थैर्य, सामाजिक अपेक्षांचा ओझा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या थकलेली आहे. कौटुंबिक कलह, घटस्फोट, व्यसनाधीनता, आत्महत्यांचे वाढते प्रमाण आणि सामाजिक हिंसा या सर्व समस्या या मानसिक असंतुलनाचे परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे वैयक्तिक मर्यादेत न राहता समाजाच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे. त्यामुळे मानसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्तीचा परिणाम केवळ त्याच्या वैयक्तिक जीवनावर नाही, तर कुटुंब, शाळा, कामाचे ठिकाण आणि समाजावरही होतो. ध्यान ही प्रक्रिया व्यक्तीला या बाह्य तणावापासून दूर नेऊन स्वतःच्या अंतर्मनाशी जोडते, त्यामुळे मानसिक संतुलन निर्माण होते आणि व्यक्तीचे सामाजिक वर्तन अधिक सकारात्मक बनते.

ध्यानाची परंपरा प्राचीन मानवतेइतकीच जुनी आहे. भारतीय तत्त्वज्ञान, उपनिषद, योग, बौद्ध तत्त्वज्ञानातील मध्यम मार्ग, जैन धर्मातील आत्मशुद्धीचा विचार, सूफी संतांचे मौन व अंतर्मुखतेचे साधन, ख्रिस्ती मिस्टिसिझम (Mysticism) किंवा चिनी ताओ तत्त्वज्ञान या सर्वच परंपरांमध्ये अंतर्मुखता, मौन आणि आत्मचिंतन यांना महत्त्व दिले गेले आहे.



या परंपरांचा उद्देश केवळ वैयक्तिक मोक्ष किंवा अध्यात्मिक उन्नती नव्हता, तर समाजात करुणा, संयम, सहिष्णुता, नैतिकता आणि सामंजस्य निर्माण करणे हाच होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ध्यान व्यक्तीच्या अहंकाराला मवाळते आणि तिला समाजाशी अधिक सुसंवादी बनवते. जेव्हा व्यक्ती स्वतःच्या विचार-भावनांचे निरीक्षण करू लागते, तेव्हा ती इतरांच्या भावना समजून घेण्यास अधिक सक्षम होते. परिणामी, सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ होतात, संवाद सुधारतो आणि सामूहिक सहकार्य वाढते.

आधुनिक समाजात तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. भांडवलशाही, उपभोगवाद, सततची स्पर्धा, सामाजिक तुलना, आर्थिक अस्थैर्य, भविष्यातील असुरक्षितता आणि यशाची व्याख्या केवळ पद, पैसा आणि प्रतिष्ठेपुरती मर्यादित झाल्यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या तणावाखाली राहत आहे. सतत इतरांशी तुलना करणे, अपयशाची भीती, अपेक्षांचा भार आणि वैयक्तिक ओळखीचा संघर्ष हे मानसिक असंतुलन वाढवतात. ध्यानामुळे व्यक्ती या सततच्या तुलनांपासून व अपेक्षांपासून काही वेळ दूर राहू शकते, वर्तमान क्षणात जगण्याची सवय लागते आणि जीवनातील छोटे, साधे आनंद अनुभवता येतात. परिणामस्वरूप, व्यक्ती स्वतःच्या जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागते, मानसिक ताण कमी होतो आणि भावनिक स्थैर्य वाढते.

कौटुंबिक जीवनावर ध्यानाचा परिणामही महत्त्वाचा आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव, गैरसमज, वेळेची कमतरता आणि सततचा तणाव यामुळे नातेसंबंध ताणलेले आहेत. घरगुती वाद, संयमाचा अभाव, चिडचिड यामुळे कुटुंबात अस्थिरता निर्माण होते. ध्यानामुळे मन शांत झाल्यावर व्यक्ती संयमी, समजूतदार आणि संवेदनशील बनते. त्यामुळे संवाद सुधारतो, सहनशीलता वाढते, आणि कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतात. शांत मनातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा संपूर्ण घरच्या वातावरणावर परिणाम करते आणि सामाजिक सलोखा मजबूत होतो.

शिक्षणक्षेत्रात ध्यानाचे महत्त्व आज विशेषत्वाने जाणवते. विद्यार्थ्यांचे जीवन आज प्रचंड स्पर्धेने भरलेले आहे. परीक्षा, गुण, करिअर, पालकांच्या अपेक्षा आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असतात. लहान वयातच तणाव, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. ध्यानामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते, भावनिक समतोल राखला जातो आणि शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी बनते. मानसिकदृष्ट्या संतुलित विद्यार्थी पुढे जाऊन समाजात अधिक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनतात. म्हणूनच शिक्षणसंस्थांनी ध्यानाचा समावेश करणे काळाची गरज आहे.

कामकाजाच्या ठिकाणीही ध्यानाचे महत्त्व मोठे आहे. दीर्घ कामाचे तास, कामाचा ताण, लक्ष्यपूर्तीची सततची धावपळ आणि नोकरीची असुरक्षितता यामुळे कर्मचारी मानसिकदृष्ट्या थकलेले असतात. याचा परिणाम कार्यक्षमतेवर, आरोग्यावर, वैयक्तिक जीवनावर आणि सामाजिक नात्यांवर होतो. ध्यानामुळे मन शांत राहते, निर्णयक्षमता सुधारते, तणाव कमी होतो आणि सहकाऱ्यांशी नातेसंबंध अधिक सौहार्दपूर्ण बनतात. त्यामुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि उत्पादनक्षमता वाढते.

स्त्रियांच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. अनेक पातळ्यांवर जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा, कौटुंबिक भूमिका आणि स्वतःची ओळख जपण्याचा संघर्ष यामुळे स्त्रिया मानसिकदृष्ट्या थकतात. स्वतःसाठी वेळ काढणे अनेकदा त्यांना शक्य होत नाही. ध्यान स्त्रियांना स्वतःशी जोडते, अंतर्मनाचा आवाज ऐकायला शिकवते आणि भावनिक बळ देते. मानसिकदृष्ट्या सक्षम स्त्री ही कुटुंबात शांतता आणि समाजात सकारात्मकता पसरवू शकते. त्यामुळे ध्यान केवळ वैयक्तिक नाही तर सामाजिक आरोग्यासाठीही महत्त्वाचे ठरते.

डिजिटल युगात ध्यानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि सतत उपलब्ध असलेली माहिती यामुळे मनाला विश्रांती मिळत नाही. सतत येणाऱ्या सूचना, संदेश आणि आभासी जगातील तुलना यामुळे असमाधान, एकाकीपणा आणि तणाव वाढतो. अनेकदा लोक आभासी जगात अधिक आणि वास्तवात कमी जगताना दिसतात. ध्यान ही प्रक्रिया माणसाला या डिजिटल गोंगाटातून बाहेर काढते, स्वतःच्या वास्तवाशी जोडते आणि मन शांत ठेवते. काही काळ श्वासावर लक्ष केंद्रित केल्यास मानसिक ताण कमी होतो, भावनिक स्थैर्य वाढते आणि सजगता, आत्मभान आणि संवेदनशीलता विकसित होते.

पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही ध्यानाचे महत्त्व अधोरेखित होते. निसर्गापासून तुटलेले नाते, अतिरेकी उपभोग, लोभ व प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. शांत मनातून निसर्गाकडे पाहिल्याने त्याचे महत्त्व जाणवते, जपणुकीची भावना निर्माण होते आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा मिळते. अंतर्मन शांत झाल्यावर बाह्य जगाशी असलेले नाते अधिक सुसंवादी, जबाबदार आणि समतोल बनते.

जागतिक ध्यान दिन साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे जगभरातील लोकांनी काही क्षण स्वतःसाठी काढून अंतर्मनाशी संवाद साधावा, जीवनाच्या धावपळीला विराम द्यावा आणि जीवनातील खरी मूल्ये जाणीवपूर्वक अनुभवावी. ध्यान कोणत्याही एका धर्माशी, जातीशी किंवा पंथाशी मर्यादित नाही. ते सार्वत्रिक मानवी अनुभवाचे साधन आहे, जे प्रत्येक व्यक्तीस मानसिक स्थैर्य, सामाजिक संवेदनशीलता आणि जीवनाचा समतोल साधण्याची संधी देते.

समारोप करताना असे म्हणता येईल की, जागतिक ध्यान दिन हा केवळ एका दिवसापुरता उत्सव नसून, तो मानसिक, भावनिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल साधण्याचा संदेश देणारा दिवस आहे. बाह्य प्रगती जितकी महत्त्वाची आहे, तितकीच अंतर्मनाची शांतताही आवश्यक आहे. शांत, स्थिर, सजग आणि संवेदनशील मन हेच सुखी, समतोल आणि समाधानकारक जीवनाचे खरे अधिष्ठान आहे. २१ डिसेंबरचा जागतिक ध्यान दिन आपल्याला हेच शिकवतो की, धावत्या जगात काही क्षण थांबून स्वतःकडे पाहणे, अंतर्मनाशी संवाद साधणे, जीवनातील तणाव कमी करणे आणि समाजाशी सुसंवाद ठेवणे हेच खरे मानवतेचे आणि समृद्धतेचे मूळ आहे.

**डॉ.राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## प्रताप

डोकेकाढे अचानक
कधीकधी जुने पाप
काळवेळ अतिसक्त
पदरात टाकले माप

न्याय भले विलंबाने
कुणांसही नसे माफ
भल्या रे दिग्गजांचा
होणारं सुफडा साफ

ऑलवेल असे जेंव्हा
भोवतात जुने प्रताप
मागे लागे साडेसाती
अधिक हो मनस्ताप

गाडून टाके खोलवर
कृष्णकृत्ये आडमाप
उकरून ते काढे मढे
भोवले ते अभिशाप

शिक्षा हवी पातकांस
कितीही करा विलाप
भोगभोगलेचं पाहिजे
उपयुक्त नसतोप्रलाप

माहीत नसे नाचणारं
किती पातके अद्याप
वेळकधी गेली निघून
आता वाटे पश्चात्ताप

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# आचारसंहिता उल्लंघनावर राहणार विशेष पथकांची काटेकोर नजर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता १५ डिसेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगामार्फत जाहीर झाली असून आचारसंहितेचे पालन होत असल्याबाबत निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या संनियंत्रणाखाली आचारसंहिता कक्ष व त्या अंतर्गत विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आठ निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये सुरु झाली असून त्या प्रत्येक कार्यालयासाठी पहिल्या टप्प्यात तीन आचारसंहिता पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. यामध्ये स्थिर सर्वेक्षण पथक, भरारी पथक व व्हिडीओ सर्व्हिलन्स पथक कार्यरत होत आहेत. यासोबतच प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र व्हिडीओ पाहणी पथकेही कार्यरत असणार आहेत.

या पथकांद्वारे मतदारांना लाच देणे, वस्तूंचे – पैशाचे – मद्याचे वाटप करणे अथवा इतर प्रलोभन दाखवणे, धाकदपटशा दाखविणे आदी आचारसंहितेचा भंग करणाऱ्या बाबींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. धार्मिक वा सामाजिक तणाव, प्रतिस्पर्धांवरील विपर्यास्त टिका, प्रार्थनास्थळांचा वापर, घोषणा व जाहीराती, कार्यक्रमांचे आयोजन अशा आचारसंहिता विषयक विविध बाबींवर या पथकांचे बारीक लक्ष असणार आहे तसेच त्याचे व्हिडीओ छायाचित्रीकरण देखील करण्यात येणार आहे. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या सनियंत्रणाखाली मालमत्ताकर विभागाचे उपआयुक्त डॉ. अमोल पालवे या सनियंत्रण कामात समन्वय अधिकारी असणार आहेत. तसेच परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर हे आचारसंहितेच्या विविध पथकांचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. आदर्श आचारसंहिता ही निवडणूका शांततापूर्ण व नियमबद्ध आचरणात व सभ्यतेत पार पाडण्यासाठी नैतिक नियमावली असून नागरिकांचा शांततेचा अधिकार अबाधित राखण्यासाठी आणि समान संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. याकरिता सर्वांनीच आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत नागरिकांना काही तक्रार वा सूचना करावयाची असल्यास नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने १८००२२२३०९/ १८००२२२३१० हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले असून नागरिकांनी आवश्यकतेनुसार त्याचा वापर करावा व नवी मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करावे असेही आवाहन करण्यात येत आहे. लवकरच विभाग कार्यालय पातळीवरही अशाप्रकारचे हेल्प डेस्क सुरु करण्यात येत आहेत.

# मुलांवर वास्तववादी महापुरुषांची चरित्रे बिंबवा !

ख्रिसमस तोंडावर आल्याने शहरातील बाजारपेठा लाल टोप्यांनी, सांताक्लॉजच्या मुखवट्यांनी आणि रंगीबेरंगी तोरणांनी सजल्या आहेत मुंबईतील काही ठिकाणी हे स्टॉल्स एवढ्या मोठ्या संख्येने लावण्यात आले आहेत कि आपण भारतात राहत आहोत कि इंग्लडमध्ये हा प्रश्न पडावा. सध्याच्या स्पर्धेच्या युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालकांचा आपल्या पाल्यांना शाळाप्रवेश घेण्यासाठी कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांकडे कल वाढला आहे त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून ख्रिसमस आणि सांताक्लॉजची क्रेज भारतात झपाट्याने वाढते आहे. दसरा दिवाळीसारखा ख्रिसमससुद्धा साजरा होऊ लागला आहे. ख्रिसमस खरेतर ख्रिस्ती पंथियांचा सण आहे. त्यांनी तो त्यांच्या परंपरेनुसार साजरा करणे योग्य आहे. सध्या मात्र समस्त शाळा महाविद्यालयांतून, खाजगी कंपन्यांच्या कार्यालयातून तो एक मौजेचा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. ख्रिसमसच्या निमित्ताने रंगवले जाणारे सांताक्लॉजचे काल्पनिक पात्र खरे करून दाखवले जाऊ लागले आहे. मॉल, बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये यांमध्ये सांताक्लॉजची वेशभूषा करून एखाद्याला येणाजाणाऱ्यांचे मनोरंजन करण्यासाठी उभे केले जाते. २४ डिसेंबरला रात्री सांताक्लॉज बाबा येतो आणि लहान मुलांसाठी खेळणी आणि खाऊ देऊन जातो अशा भ्रामक कल्पना मुलांच्या कोवळ्या मनावर बिंबवल्या जाऊ लागल्या आहेत. शहरासारख्या ठिकाणी काही शाळांमधूनही पालकांना तसे करण्यास सांगितले जाते. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मुलांना वास्तववादी जगाचे भान बालवयापासूनच करून द्यायला हवे. काल्पनिक गोष्टी सांगण्याऐवजी नीती आणि नैतिक मूल्यांचे मूर्तिमंत उदाहरणे असणाऱ्या महापुरुषांची चरित्रे गोष्टीरूपात सांगायाला हवीत. त्यांचे पराक्रम, समाजकार्य आणि त्यांनी केलेला त्याग मुलांना समजवायला हवा. भारतीयांचे परमभाग्य आहे कि जगभरातील अन्य कोणत्याही देशाला न लाभलेले थोर अवतारी पुरुष, पराक्रमी राजे, क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष भारताला शेकडोंच्या संख्येने लाभले आहेत. त्यांची चरित्रे आपल्याकडे पुस्तकांसह इंटरनेटवरही उपलब्ध आहेत. ही चरित्रे बालवयापासून मुलांच्या मनावर बिंबवल्यास येणारी पिढी चारित्र्यसंपन्न, धैर्यशील आणि नीतिवान होण्यास नक्कीच मदत होईल. त्यामुळे पालकांनी मुलांवर सांताक्लॉज सारखी काल्पनिक पात्रे बिंबवण्यापेक्षा महापुरुषांची वास्तववादी चरित्रे बिंबवावीत.

**– सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यांवर होणार कारवाई



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सोशल मीडियाचा गैरवापर रोखण्यासाठी शहर पोलिसांनी कंबर कसली आहे. शहरातील कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी सोशल मीडिया ग्रुप ॲडमिन आणि सदस्यांना कडक इशारा देणारी नोटीस बजावली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी जिल्ह्यात प्रतिबंधक आदेश लागू केले आहेत. कोणत्याही उमेदवाराची वैयक्तिक बदनामी करणे, फोटोंशी छेडछाड करून ते प्रसारित करणे किंवा जातीय व्देष पसरवणारे संदेश पाठवणे हा आता गुन्हा ठरणार आहे. विशेषतः व्हॉट्सॲप ग्रुपवर चुकीचा मजकूर आल्यास केवळ पाठवणाराच नाही, तर ग्रुप ॲडमिनला ही कायद्याच्या कचाट्यात धरले जाईल. तसेच राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे स्टेटस ठेवल्यास थेट न्यायालयीन कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक जगदीश मुलगीर यांनी आपापल्या हद्दीतील लोकांना सोशल मीडियाद्वारे ही नोटीस प्रसारित केली आहे.

## २४वी सबर्बन मुंबई सब-ज्युनिअर जिल्हास्तरीय तायक्वॉदो स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२०, मुंबई :** तायक्वॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या अधिकृत संघटनेशी संलग्न असलेल्या तायक्वॉदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेची अधिकृत स्पर्धा कै.विनायक गायकवाड संघटनेचे अध्यक्ष यांच्या स्मरणार्थ २४वी सब-ज्युनिअर जिल्हास्तरीय तायक्वॉदो स्पर्धा व १०वी सब ज्युनिअर पुमसे स्पर्धा बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्ले (पू.) येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सदर स्पर्धा या तायक्वाँदो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र,मुंबई यांच्या नियमा प्रमाणे होतील. या स्पर्धेत सबर्बन मुंबई जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेण्यात यावा.या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू हे कुडाळ, सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या ३५वी सब-ज्युनिअर राज्यस्तरीय तायक्वॉदो स्पर्धत सबर्बन मुंबईचे प्रतिनिधित्व करणार आहे. अधिक माहितीसाठी संदिप चव्हाण (सचिव) ८१६९६५६१८८, कल्पेश गोलांबडे (खजिनदार) ९५९४५९४४५५ यांच्याशी संपर्क करावा. तायक्वॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या अधिकृत संघटनेचे अध्यक्ष-अविनाश बारगजे, महासचिव-मिलिंद पठारे, सचिव सुभाष पाटील,खजिनदार-व्यंकटेश कररा यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा होत असून जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेण्यात यावा. असे सर्वांना आव्हान करण्यात आले आहे.

## मुंबईकरांचा लोकल प्रवास होणार आरामदायी

### तब्बल २३८ नवीन लोकल मध्ये असणार स्वयंचलित दरवाजे




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२०, मुंबई :** मुंबईत लोकलने प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. मुंबईची लाइफलाइन असलेल्या लोकल ट्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षा सुधारणा करण्यात येणार आहे,ज्यामध्ये २३८ नवीन गाड्यांवरील प्रवासात स्वयंचलित दरवाजे बसविण्यात येणार आहेत.केंद्र सरकारकडून लोकल निर्मितीसाठी महत्त्वाचा विचार करण्यात आला आहे. लोकल ट्रेन सेवेचे आधुनिकीकरण आणि ती अधिक सुरक्षित करण्यासाठी मोठी पावले उचलली जात आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मते, उपनगरीय रेल्वे नेटवर्कची क्षमता वाढविण्याबरोबरच, प्रवाशांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. नवीन तंत्रज्ञान, स्वयंचलित दरवाजे प्रणाली आणि सुधारित कनेक्टिव्हिटी लवकरच मुंबई लोकल ट्रेन प्रवासात बदल घडवून आणतील.मुंबईची जीवनरेखा मानली जाणारी लोकल ट्रेन सेवा मोठ्या प्रमाणात बदलत आहे. दररोज लाखो प्रवाशांना वाहून नेणारी ही उपनगरीय रेल्वे प्रणाली सुरक्षित, अधिक सोयीस्कर आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मते, मुंबई लोकल नेटवर्कची क्षमता वाढविण्याबरोबरच प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. या उपक्रमांचा थेट फायदा आता चांगल्या आणि अधिक विश्वासार्ह प्रवासाचा अनुभव घेणाऱ्या प्रवाशांना होईल.दरम्यान प्रवाशांची सुरक्षा वाढवण्यासाठी २३८ नवीन मुंबई लोकल ट्रेनमध्ये स्वयंचलित दरवाजे प्रणाली बसवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे चालत्या गाड्यांमधून पडणे यासारखे अपघात टाळण्यास मदत होईल, जे मुंबई लोकल गाड्यांसाठी एक मोठे आव्हान बनले आहे. गर्दीच्या वेळी दरवाज्यांना चिकटून राहण्याची सक्ती हळूहळू कमी होईल. रेल्वेचा असा विश्वास आहे की स्वयंचलित दरवाजे असल्याने गाड्या अधिक सुरक्षित होतील आणि प्रवाशांचा प्रवास करण्याचा आत्मविश्वासही वाढेल.

## खापरखेडा जि.प. शाळेत केंद्र क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** केंद्र खापरखेडा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने बाल खेळाडूकरिता केंद्र क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन शुक्रवार १९ डिसेंबरला जि.प.प्राथमिक शाळा, खापरखेडा येथील प्रांगणात करण्यात आले. केंद्र स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे उदघाटन सरपंच मीनाक्षी तागडे यांचे हस्ते झाले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष राजकुमार निकोसे होते.कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून सावनेर पंचायत समितीचे उपसभापती राहूल तिवारी, गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर, गटशिक्षणाधिकारी कश्यप सावरकर, शिक्षण विस्तार अधिकारी प्रदिपकुमार जनबंधू आदि उपस्थित होते. क्रीडा स्पर्धांमध्ये कबड्डी, लंगडी, खो-खो, रिलेरेस या मैदानी क्रिडा स्पर्धासमवेत वैयक्तिक व सांस्कृतिक स्पर्धांतर्गत वैयक्तिक- समूहनृत्य, वैयक्तिक - समूहगीत, वक्तृत्वस्पर्धा, इत्यादी विविध प्रकारांमध्ये बालखेळाडूंना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यास वाव मिळाला. केंद्र क्रीडा स्पर्धेच्या यशस्वी करण्यासाठी केंद्र प्रमुख संजय गुंजारकर, मुख्याध्यापक प्रशांत भशारकर यांच्यासह सर्व मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी सहकार्य केले.

# निलेश लंकेंनी मोदींना दिले रायगड भेटीचे आमंत्रण

## गड - किल्ले संवर्धन मोहिमेचं पंतप्रधान मोदींकडून कौतुक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** दिल्लीत संसदेच्या सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशना दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार नीलेश लंके यांनी दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संसद भवनात भेट घेऊन ऐतिहासिक गड-किल्लयांच्या संवर्धनासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त रायगडावर आयोजित केलेल्या सोहळ्याचे आमंत्रण दिले.

शिवराज्याभिषेकाचे साक्षीदार असलेल्या रायगडावरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याची इच्छा व्यक्त करत, शक्य तितक्या प्रमाणात उपस्थित राहण्याची ग्वाही पंतप्रधानांनी दिल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.

या भेटी प्रसंगी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे व काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी तसेच महाराष्ट्रातील इतर खासदार उपस्थित होते. या भेटी दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच गड-किल्लयांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सुरू केलेल्या मोहिमेचे कौतुक केले. गड-किल्ले हे केवळ दगड-मातीचे अवशेष नसून ते स्वराज्याच्या इतिहासाचे जिवंत प्रतीक असल्याचे सांगत, या मोहिमेमुळे तरुणांमध्ये इतिहासाबद्दल जाणीव आणि अभिमान निर्माण होत असल्याचे व लोकसहभागातून चालणारी मोहीम सातत्याने सुरू ठेवावी, असा सल्लाही त्यांनी दिल्याचे लंके यांनी सांगितले.

या भेटीत कांदा उत्पादक, रेल्वे महामार्ग व ग्रामसडक योजनेअंतर्गत २५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या वाड्या -वस्त्यांना तातडीने रस्ते जोडणी करावी, त्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि शेतीमालाच्या वाहतुकीला मोठी मदत होईल. सध्या कांदा निर्यात सुरू ठेवावी, अन्यथा भाव कोसळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल, शेतकरी हितसंबंध आणि सांस्कृतिक वारसा जपणे,यासोबतच सुपा औद्योगिक क्षेत्रासाठी सक्षम दळणवळण सुविधा आवश्यक आहे. नगर - पुणे रेल्वे प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर - पुणे महामार्गाला गती द्यावी, औद्योगिक गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल अशीही मागणी केली. या सर्व मागण्यांचे निवेदनही खासदार निलेश लंके यांनी पंतप्रधानांना दिले. या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.

# मराठा समाजाच्या न्याय व विधि-आधारित मागण्यांच्या पूर्ततेसाठी बुधवार पासून उपोषण




## पाटण तहसिल कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण (सातारा) :** पाटण तहसिल कार्यालयातून कुणबी प्रमाणपत्रांसाठी नियमबाह्य व चुकीच्या त्रुटी काढून कुणबी प्रमाणपत्र देण्यास होत असलेल्या विलंब तसेच मराठा समाजाच्या न्याय व विधि-आधारित मागण्यांच्या पूर्ततेसाठी सकल मराठा समाज पाटण तालुक्याच्या वतीने बुधवार, दि.२४ डिसेंबर २०२५ पासून पाटण तहसिल कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी सातारा, प्रांताधिकारी पाटण व पोलिस स्टेशन पाटण यांना पाटण तालुका सकल मराठा समाजाकडून देण्यात आले आहे. यावेळी प्रांताधिकारी सोपान टोंम्पे यांनी उपोषणाअगोदर कुणबी प्रमाणपत्रा संदर्भातील तहसिल कार्यालयातील अधिकारी कर्मचारी, महाईसेवा, सेतू केंद्रातील संबंधित कर्मचारी यांच्या समवेत बैठक लावून प्रश्न मिटविण्याचे आश्वासन मराठा समाजाला दिले. या निवेदनात पुढे म्हटले आहे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रं- २२९ दि.०३ जुलै २०१८ च्या शासन निर्णयानुसार पूर्वीच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी इतर जातींच्या दाखल्यांसाठी असणारी कार्यपद्धती त्या अनुषंगाने कुणबी दाखल्यांसाठी निश्चित केलेली कार्यपद्धती सध्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी पुर्णतः बदलून जे आवश्यक नसणाऱ्या बाबी कुणबी प्रकरणात घालून अर्जदारांची डोकेदुखी वाढवली आहे.

अधिकारी, कर्मचारी यांनी बदल केलेल्या नियमानुसार कुणबी दाखला काढण्यासाठी अर्जदारास पाटण तहसिल कार्यालयात सहा ते आठ महिने हेलपाटे मारावे लागत आहेत. याची गांभीर्याने वरिष्ठांनी दखल घेऊन शासन निर्णयानुसार इतर जातींच्या दाखल्या प्रमाणे कुणबी दाखल्यांची कार्यपद्धती अवलंबवावी अशी मागणी सकल मराठा समाजाने केली आहे.कुणबी नोंद असलेली कुटुंब गेली ५८ वर्ष आरक्षण पासून वंचित आहेत आम्हाला बुधवार, दि.२४ डिसेंबर पर्यंत न्याय द्यावा अन्यथा सकल मराठा समाजाकडून पाटण तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल. असा इशारा

या निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. या निवेदनावर सकल मराठा समाजाचे यशवंतराव जगताप, राजेंद्र निकम, राहुल शेडगे, विवेक कुराडे, प्रशांत पाटील, शंकरराव मोरे, प्रदीप घाडगे, लक्ष्मण चव्हाण, राजाभाऊ काळे, शिवाजी निकम, शामराव मोरे, मनोहर यादव, प्रविण लुगडे, अनिल भोसले, अमोल काजारी, शंकरराव मोहिते, विद्या म्हासुर्णेकर, विद्या शिंदे आदी मराठा समाज सेवकांच्या सह्या आहेत.

# 'व्हिजिट माय पोलीस स्टेशन' उपक्रमात महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याला प्रथम क्रमांक




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२० कल्याण (ठाणे) :** नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याच्या तसेच पोलिसांविषयीचे नकारात्मक समज दूर करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'व्हिजिट माय पोलीस स्टेशन' उपक्रमात महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याने घवघवीत यश संपादन करत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाअंतर्गत येणाऱ्या एकूण ३५ पोलीस ठाण्यांमध्ये हा उपक्रम २९ नोव्हेंबर २०२५ रोजी एकाच दिवशी राबविण्यात आला. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे पोलीस आयुक्तालय, ग्लोबल केअर फाउंडेशन आणि नॅशनल सर्व्हिस स्कीम यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कल्याण येथील महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमाला सर्व वयोगटातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक तसेच महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. जवळपास अडीच ते ३ हजार नागरिकांनी पोलीस ठाण्यातील विविध विभागांना प्रत्यक्ष भेट देत पोलिसांची कार्यपद्धती, कायदेशीर प्रक्रिया, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठीचे 'आधारवड' ॲप, 'पोलीस मित्र' ॲप व विविध हेल्पलाइनची सविस्तर माहिती घेतली.

या उपक्रमा दरम्यान महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी व अंमलदारांनी नागरिकांशी उत्कृष्ट संवाद साधत पोलिसांची भूमिका, जबाबदाऱ्या आणि सेवा याबाबत प्रभावीपणे मार्गदर्शन केले. त्यामुळे नागरिकांमधील पोलिसांविषयीची अनावश्यक भीती दूर होण्यास मदत झाली.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याला 'सर्वोत्कृष्ट पोलीस स्टेशन' म्हणून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. परदेशी यांनी सर्व अधिकारी, अंमलदार तसेच सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे आभार मानले आहेत.

# अजय साळुंखे यांचा सहकाऱ्यांसह बहुजन समाज पार्टीत प्रवेश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, घणसोली (नवी मुंबई) :** निवडणुकीचे पडघम वाजू लागलेत, राज्यात महानगरपालिका निवडणुकीची तारीख निश्चित झाली आहे. आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. इच्छुक उमेदवार निवडणूक लढविण्याचे मनसुबे रचत आहेत. जिंकून येऊन नगरसेवक बनवण्याचे स्वप्न पाहत आहेत. त्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व साहित्याची जुळवाजुळव करत आहेत. पक्ष श्रेष्ठींकडे तिकिटाकरिता आपला बायोडाटा देत आहेत. सर्व ठिकाणी लगबग चालू आहे. नवी मुंबई ही याला अपवाद नाही.नवी मुंबईतील पावणे गाव येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते अजय साळुंखे हे बहुजन समाज पार्टीच्या तिकिटावर निवडणूक लढवत असून




आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसोबत त्यांनी बहुजन समाज पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. बहुजन समाज पार्टीचे नवी मुंबईचे अध्यक्ष प्रा.दत्ता हेगडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घणसोली येथे पार पडला.

यावेळी नवी मुंबई उपाध्यक्ष अरविंदसिंग राव, बेलापूर विधानसभेचे अध्यक्ष विनोद धुरंधर, शशांक कांबळे व इतर पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष प्रा. दत्ता हेगडे म्हणाले की, अजय साळुंखे सारख्या तरुण युवकांची बहुजन समाज पार्टीमध्ये गरज आहे. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचा आवाज बुलंद करण्यासाठी तरुणांनी अजयच्या पाठीमागे रहावे. बहुजन समाज पार्टी मोठ्या ताकतीने अजय साळुंखे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करेल. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहुजन नायक मान्यवर कांशीरामजी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून बहुजन समाज पार्टी, नवी मुंबई महानगर पालिकेची निवडणूक कोणाशीही युती न करता स्वबळावर स्वतःच्या ताकतीने लढणार आहे, असेही प्रा. दत्ता हेगडे यांनी स्पष्ट केले.

